
# विधिमंडळ अर्थसंकल्पीय कामकाज

## नियम व वास्तव

वर्ष २००७-०८ ते २०११-१२




समर्थन प्रकाशन

**समर्थन**

स्व. सदानंद वर्दे
(संस्थापक, अध्यक्ष)

अध्यक्ष : श्री. चंद्रशेखर प्रभू
उपाध्यक्ष : श्री. टी. के. चौधरी
कार्याध्यक्ष : श्री. विवेक पंडित

संपादक
**मुक्ता भारती**

विश्लेषक
**गुरुनाथ सावंत, रुपेश किर, मैत्रेय ह्याळींग**

अक्षरजुळणी: **प्रतिक्षा कोयंडे**

नोंदणी क्रमांक:
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३,
मुंबई सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

प्रकाशक (पत्रव्यवहार):
समर्थन - ११५, धुरी कमर्शीयल प्लाझा, वसई रोड रेल्वे स्थानकाजवळ, वसई (पू), ठाणे – ४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३ / १०४
Email: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

### 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# विधिमंडळ अर्थसंकल्पीय कामकाज
# नियम व वास्तव

विधिमंडळाने अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे विधिमंडळ हे लोकशाहीचा गाभा आहे. जनतेच्या आशा-आकांक्षा त्यात प्रतिबिंबित होत असतात. विधिमंडळाच्या या पवित्र मंदिराचा पाया स्वातंत्र्यसैनिकांनी घातला, श्रध्देय एस. एम.जोशी, कॉ. डांगे, यशवंतराव चव्हाण, दि. बा. पाटील, एन. डी. पाटील, मृणाल गोरे, बी. टी. देशमुख यासारख्या अभ्यासू संसदपटूंच्या पदस्पर्शाने विधिमंडळ पुनित झाले. साऱ्या स्वातंत्र्यसैनिकांना तसेच विधिमंडळ सशक्त करणाऱ्या सर्व अभ्यासू संसदपटूंना 'समर्थन'चा लाख लाख सलाम !

विधिमंडळ अधिकाधिक लोकाभिमुख व्हावे, विधिमंडळावरील जनतेचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यादृष्टीने विधिमंडळाचे कामकाज अत्यंत प्रभावी होणे गरजेचे आहे. 'लोकशाही' ने माझ्या जीवनात आमूलाग्र बदल होऊ शकतो, असा विश्वास देण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम विधिमंडळाकडून अपेक्षित आहे. शासनावर अंकुश ठेवणे, अर्थसंकल्प मंजूर करणे, कायदे बनविणे ही महत्त्वाची कामे विधिमंडळ करत असते. भारतीय संविधानाप्रमाणे वित्तीय कायदा मान्यतेसाठी विधिमंडळासमोर येतो, हा संविधानिक दर्जा विशेष महत्त्वाचा आहे.

अर्थसंकल्प हा शासनाच्या धोरणाचा आरसा आहे. शासनाने कितीही घोषणा केल्या, कंठशोष केला तरी जोवर त्या घोषणा अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये प्रतिबिंबित होत नाहीत तोपर्यंत शासनाच्या घोषणा या पोकळ वल्गनाच ठरतात. म्हणूनच शासनाचे प्राधान्यक्रम, ध्येय धोरणे, सामाजिकता अर्थसंकल्पात प्रतिबिंबित होत असते. 'समर्थन' अर्थसंकल्पाचा अभ्यास याकरिता करते की, धोरणांचा खराखुरा अन्वयार्थ विधिमंडळ, माध्यमं आणि बुद्धिवाद्यांपर्यंत पोहोचावा. अर्थसंकल्प विधिमंडळासमोर सादर केल्यानंतर होणाऱ्या चर्चेसंदर्भात काही नियम घालून दिलेले आहेत. त्या नियमांनुसार विधिमंडळाचे कामकाज होते का? ते पाहण्याचा प्रयत्न 'समर्थन'ने या पुस्तिकेच्या निमित्ताने केला आहे. अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील विषयांवर लोकशाहीच्या पवित्र मंदिरात किती वेळ व कशी चर्चा होते? किती सन्माननीय सदस्य या चर्चेत सहभागी होतात? त्यांना आपलं म्हणणं मांडायला किती अवधी मिळतो हा देखील अभ्यासाचा विषय आहे. प्रस्तुत पुस्तिकेमध्ये यासंदर्भातील अभ्यासपूर्ण विश्लेषणात्मक निष्कर्ष मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यातून एक गोष्ट मात्र प्रकर्षाने जाणवते की हजारो कोटींचा अर्थसंकल्प अत्यंत नगण्य चर्चेने मंजूर होतो. त्यावर सांगोपांग चर्चा वा ध्येयधोरणांची चिकित्सा होत नाही. यावर एकच उपाय दृष्टिपथात आहे तो म्हणजे, विधिमंडळाच्या स्थायी समित्या पुनरुज्जीवित होणे. विधिमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने विधिमंडळाच्या नियमाप्रमाणे स्थायी समित्या पुनर्गठीत करून कार्यान्वित करण्याचे ऐतिहासिक कार्य झाले तर आणि तरच अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करण्याचे समाधान विधिमंडळ महाराष्ट्रातील जनतेला देऊ शकेल.

**- विवेक पंडित**

## अनुक्रमणिका


| अक्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **विधानसभा नियमावलीतील अर्थसंकल्पीय कामकाजाबाबतचे नियम.** | ३ |
| २. | **महत्त्वाचे मुद्दे** | ४ |
| ३. | **अर्थसंकल्पीय नियमांची पायमल्ली** | ५ |
| ४. | **महात्माजींच्या स्वप्नातील ग्राम विकास तसेच अल्पसंख्याक विकास चर्चेच्या प्रतिक्षेत!** | ६ |
| ५. | **वर्ष २००७-०८ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन** | ७ |
| | **अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान** : ५५,२८६ कोटी १९लाखांच्या अर्थसंकल्पावर केवळ २६ तास चर्चा. | |
| ६. | **वर्ष २००८-०९ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन** | १० |
| | अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान : | |
| | ३१ मार्च ०८ रोजी झालेल्या गोंधळामध्ये गृह विभागाच्या रु. ४ हजार १८९ कोटी ७५लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर | |
| ७. | **वर्ष २००९-१० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन.** | १३ |
| | अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा. | |
| | अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा. | |
| ८. | **वर्ष २०१०-११ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन.** | १७ |
| ९. | **वर्ष २०११-१२ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन.** | २० |
| १०. | **मागील पाच वर्षामध्ये अधिवेशनातील सदस्यांची उपस्थिती** | २४ |
| ११. | **प्रश्न : स्वीकृत तारांकित प्रश्नांपैकी मागील ५ वर्षात केवळ ६ टक्के प्रश्न चर्चेला** | २५ |
| १२. | **लक्षवेधी सूचना : मागील ६ वर्षांत एकूण सूचनांपैकी १९ टक्के सूचना स्वीकृत तर केवळ ५ टक्के सूचनांवर चर्चा** | २७ |
| १३. | **अशासकीय ठरावावर चर्चा केवळ एक टक्का!** | २८ |
| १४. | **सहा वर्षात ९८% स्थगन प्रस्तावाच्या सूचनांवर चर्चा शून्य** | २९ |
| १५. | **औचित्याचे मुद्दे** | ३० |
| १६. | **अर्धा-तास चर्चा** | ३१ |

# विधानसभा नियमावलीतील अर्थसंकल्पीय कामकाजाबाबतचे नियम

**नियम २४६ (१)** नुसार, अध्यक्ष, सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करून, अर्थसंकल्प सादर केला असेल त्या दिवसापासून पूर्ण सात दिवसांच्या आतील नसतील असे, नंतरचे जास्तीत जास्त सहा दिवस नेमून देतील आणि अशारितीने नेमून दिलेल्या दिवशी, विधानसभेत संपूर्ण अर्थसंकल्पाच्या संबंधाने किंवा अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेल्या तत्त्वाच्या कोणत्याही प्रश्नांची चर्चा करण्यास मोकळीक असेल. परंतु, यावेळी कोणताही प्रस्ताव मांडण्यात येणार नाही किंवा अर्थसंकल्प विधानसभेच्या मताकरिता सादर करण्यात येणार नाही.

**नियम २४६ (२)** नुसार, अध्यक्षांना योग्य वाटेल तर, त्यांना, भाषणांसाठी कालमर्यादा विहित करता येईल.

**नियम २४७** नुसार, विधानसभा अर्थसंकल्पाचा विचार दोन टप्प्यांत करील, १. सर्वसाधारण चर्चा आणि २. अनुदानासाठीच्या मागण्यांवर मतदान.

**नियम २५१ (१)** नुसार, अनुदानासाठीच्या मागण्यांवर मतदान घेण्याचे काम अध्यक्षांनी, सभागृहाच्या नेत्यांशी विचारविनिमय करून त्या कारणाकरिता नेमून दिलेल्या दिवशी चालेल, मात्र असे दिवस अठराहून जास्त असणार नाहीत: परंतु, अर्थसंकल्प सादर करण्याच्या दिनांक व मागण्यांवर मतदान घेण्याचा पहिला दिवस यांच्या दरम्यान निदान दहा दिवसांचा काळ लोटला पाहिजे.

**नियम २५१ (२)** :- अशारितीने नेमून दिलेल्या दिवसांपैकी शेवटच्या दिवशी, विधानसभेच्या तहकुबीसाठी अध्यक्षांनी नेमलेल्या वेळेच्या अर्धा-तास आधी अध्यक्ष, अनुदानासाठीच्या मागण्यांच्या संबंधातील शिल्लक असलेल्या सर्व बाबी निकालात काढण्यास जरुर असलेला प्रत्येक प्रश्न लागलीच मतास टाकतील, आणि कोणत्याही स्थगन प्रस्तावाद्वारे त्यावर चर्चा करण्यात येणार नाही किंवा इतर कोणत्याही रीतीने त्यात अडथळा आणण्यात येणार नाही किंवा त्यासंबंधी कोणताही दीर्घसूत्री प्रस्ताव मांडण्यात येणार नाही.

*स्रोत : महाराष्ट्र विधानसभा नियम, २००९*

- ***वरील नियम विधानसभा नियमावलीत असूनही विधिमंडळाने मागील पाच वर्षात अर्थसंकल्प सादर करणे व सर्वसाधारण चर्चा या दरम्यान सात दिवसही दिलेले नाहीत.***
- ***अनुदानाच्या मागण्यांवर अठरा दिवस चर्चा करू शकत असूनही विधिमंडळाने मागील पाच वर्षात सरासरी केवळ ७ दिवस चर्चा केली आहे.***
- ***विधिमंडळाने नियम २५१ (१) धाब्यावर बसवून वर्ष २००९-१० ते वर्ष २०११-१२ पर्यंत अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करण्याआधी सदस्यांना दहा दिवसांचा कालावधी दिलेला नाही.***

## महत्त्वाचे मुद्दे

- मागील पाच वर्षात राज्याच्या एकूण अर्थसंकल्पापैकी रु. १ लाख १७ हजार १८६ कोटी ३७ लाखांचा अर्थसंकल्प विनाचर्चा मंजूर करण्यात आला.
- वर्ष २००७-०८ च्या राज्य अर्थसंकल्पापैकी १३ विभागांचा मिळून रु. ३९ हजार ३६३ कोटी २३ लाख इतका अर्थसंकल्प विनाचर्चा मंजूर करण्यात आला ज्यात वित्त विभाग (रु. २२४५१ कोटी ३४ लाख) व महिला व बाल विकास विभाग (रु. ७६६ कोटी ३६ लाख ) या विभागांचा समावेश होता.
- वर्ष २००८-०९ मध्ये ७ विभागांचा मिळून तब्बल रु. ४२ हजार २९७ कोटी ७४ लाखांचा तर वर्ष २००९-१० मध्ये एकूण ९ विभागांचा मिळून रु. २५ हजार ४८९ कोटी ८१ लाखांचा अर्थसंकल्प विनाचर्चा मंजूर करण्यात आला होता.
- वर्ष २००६-०७ ते वर्ष २०११-१२ पर्यंत एकाही अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधि व न्याय विभाग चर्चेला घेण्यात आलेला नाही.
- मागील पाच वर्षात सदस्यांना विभागवार चर्चेत भाषणासाठी मिळणारा सरासरी वेळ फक्त १० मिनिटे.
- तर मागील पाच वर्षात विभागवार चर्चेत होणाऱ्या भाषणामध्ये सदस्यांचा सरासरी सहभाग फक्त १२ टक्के.
- विधि व न्याय विभाग, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय हे तीन विभाग मागील पाच वर्षात एकदाही चर्चेस आलेले नाहीत तर अल्पसंख्यांक विकास विभाग हा मागील तीन वर्षात एकदाच चर्चेला आलेला आहे.
- अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा जास्तीत जास्त सहा दिवस घेणे नियमात असुनही सतत चर्चा केवळ दोन दिवसामध्ये आटोपलेली आहे.
- स्वीकृत तारांकित प्रश्नांपैकी मागील ५ वर्षात केवळ ६ टक्के प्रश्न चर्चेला घेण्यात आले तर सहा वर्षात ९८% स्थगन प्रस्तावाच्या सूचनांवर चर्चा झाली नाही.

# अर्थसंकल्पीय नियमांची पायमल्ली !

अर्थसंकल्प सादर करण्यासाठी घटनेत २०२ हे कलम आहे. त्याकरिता विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन घेतले जाते. सर्वसाधारण चर्चेसंबंधी नियम २४६ (१) नुसार अर्थसंकल्प सादर केला असेल त्या दिवसापासून पूर्ण सात दिवसांच्या आतील नसतील असे, म्हणजेच एका आठवड्यानंतरचे जास्तीत जास्त सहा दिवस सर्वसाधारण चर्चेसाठी दिले जातात. याचाच अर्थ अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर सुमारे सात दिवस सदस्यांना अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्यास मिळणे अपेक्षित असूनही विधिमंडळ सदस्यांना मागील पाच वर्षात चर्चेसाठी अपेक्षित कालावधी मिळालेला नाही.

**तक्ता क्र. १** : अर्थसंकल्प सादर होणे व सर्वसाधारण चर्चा यांमधील कालावधी.

| वर्ष | अर्थसंकल्प सादर झाल्याचा दिनांक | सर्वसाधारण चर्चेचा दिनांक | अर्थसंकल्प सादर होणे व चर्चेदरम्यानचे दिवस |
|---|---|---|---|
| २००७-०८ | २२ मार्च २००७ | २६ मार्च २००७ | ३ |
| २००८-०९ | १९ मार्च २००८ | २५ मार्च २००८ | ५ |
| २००९-१० | १७ मार्च २००९ (अंतरिम अर्थसंकल्प) | १८ मार्च २००९ | ० |
| २००९-१० | ०४ जून २००९ (अतिरिक्त अर्थसंकल्प) | ०८ जून २००९ | ३ |
| २०१०-११ | २५ मार्च २०१० | २९ मार्च २०१० | ४ |
| २०११-१२ | २३ मार्च २०११ | २९ मार्च २०११ | ५ |

*स्रोत: संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००७ ते २०११*

- अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या आधी सदस्यांना अभ्यासासाठी कमीत कमी ७ दिवस मिळणे आवश्यक असूनही वरील तक्ता पाहता मागील पाच वर्षात विधिमंडळाने एकदाही ७ दिवसांचा कालावधी सदस्यांना दिलेला नाही.
- अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा जास्तीत जास्त सहा दिवस घेणे नियमात असूनही सतत चर्चा केवळ दोन दिवसामध्ये आटोपली गेली आहे.

# महात्माजींच्या स्वप्नातील ग्राम विकास तसेच अल्पसंख्याक विकास चर्चेच्या प्रतिक्षेत!

**तक्ता क्र.** २ : पाच वर्षात चर्चेला आलेले विभाग

| मागील पाच वर्षात | विभाग |
|---|---|
| एकदाही चर्चेला न आलेले विभाग | विधि व न्याय विभाग, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय. |
| केवळ एकदा चर्चेला आलेला विभाग | अल्पसंख्यांक विकास विभाग. |
| दोनदा चर्चेला आलेले विभाग | ग्राम विकास व जलसंधारण, पर्यटन व सांस्कृतिक कार्य, नियोजन विभाग, पर्यावरण विभाग. |
| तीनदा चर्चेला आलेले विभाग | वित्त विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, सामान्य प्रशासन, रोजगार व स्वयंरोजगार विभाग. |
| चर्चेला येऊनही गोंधळामुळे चर्चा न झालेले विभाग. | सार्वजनिक बांधकाम, अन्न व नागरी पुरवठा, कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग (वर्ष २००७-०८),<br>गृह विभाग (वर्ष २००८-०९).<br>महसूल व वन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य, पाणी पुरवठा व स्वच्छता, रोजगार व स्वयंरोजगार विभाग. (वर्ष २००९-१०). |
| सातत्याने चर्चेला येणारे विभाग | गृह विभाग, महसूल व वन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, आदिवासी विकास विभाग, उच्च व तंत्र शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यंव्यवसाय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, जलसंपदा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य विभाग, नगर विकास विभाग, उद्योग उर्जा व कामगार, गृह निर्माण विभाग. |

*स्रोत: संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००७ ते २०११*

- विधि व न्याय विभाग, संसदीय कार्य विभाग, महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय हे तीन विभाग मागील पाच वर्षात एकदाही चर्चेस आलेले नाहीत तर अल्पसंख्यांक विकास विभाग हा मागील तीन वर्षात एकदाच चर्चेला आला असल्याचे वरील तक्त्यावरून दिसून येते.
- गृह विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य, पाणी पुरवठा व स्वच्छता, रोजगार व स्वयंरोजगार या सारखे महत्त्वाचे विभाग चर्चेला येऊनही सभागृहातील गोंधळामुळे त्यावर चर्चा झालेली नव्हती.

# मार्च / एप्रिल २००७-०८ अर्थसंकल्पीय अधिवेशन

## सर्वसाधारण चर्चेत केवळ ११ टक्केच सदस्यांचा सहभाग - एका सदस्यास सरासरी १३ मिनिटे !

तक्ता क्र. ३ सर्वसाधारण चर्चेची वेळ व सदस्यांचा सहभाग

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | सर्वसाधारण चर्चेची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | चर्चेत सहभागी सदस्य | उपस्थित सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ मार्च ०७ | ७ ता. १६ मि. | ३ ता. २० मि. | १ ता. १० मि. | २ ता.१० मि. | - | ७ | १०६ | १८ मि. | ६.६० |
| २८ मार्च ०७ | ७ ता. १२ मि. | ४ ता. १५ मि. | - | ४ ता.१५ मि. | १ ता. २५ मि. (दि. २९/३/०७) | ३२* | २०४ | ८ मि. | १५.६८ |
| २ दिवस | १४ ता.२८ मि. | ७ ता. ३५ मि. | १ ता. १० मि. | ६ ता. २५ मि. | १ ता २५ मि. | ३९ | १५५* | १३ मि. | ११.१४* |

** सभागृहात गोंधळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्यानेसभागृहाची बैठक चर्चेदरम्यान तीन वेळा स्थगित करण्यात आली होती. त्याकारणाने वित्तमंत्र्यांनी दुसऱ्या दिवशी (२९/३/०७) उत्तर दिले होते.*
** सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००७-०८*

## सामाजिक न्याय वर्ष साजरे करणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला व बाल विकास व सामाजिक न्याय विभागांच्या चर्चेला हरताळ

तक्ता क्र. ४ : वर्ष २००७-०८ मध्ये चर्चेला न आलेले विभाग व विभागाचा अर्थसंकल्प (रु. कोटीत)

| विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|
| वित्त विभाग | २४५६८.५१ | महिला व बाल विकास | ८१४.९४ | विधि व न्याय | ४३०.५५ |
| ग्राम विकास व जलसंधारण | ४३६३.३४ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २३६८.७३ | संसदीय कार्य | ००.८६ |
| महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय | ५७.१४ | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य | ६५०.१४ | रोजगार व स्वयंरोजगार | ३१.०९ |
| सामान्य प्रशासन | ३६५.६९ | नियोजन विभाग | ५४१६.८४ | पर्यावरण | ५.०५ |
| पर्यटन व सांस्कृतिक कार्य | २९०.३५ | | | | |
| एकूण | | | | | ३९३६३.२३ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या रु.४३६३.३४ कोटी, महिला व बाल विकास विभागाच्या रु.८१४.९४ कोटी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रु.२३६८.७३ कोटी, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य विभागाच्या रु.६५०.१४ कोटी आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या रु.३१.०९ कोटींच्या मागण्या विना चर्चा मंजूर करण्यात आल्या होत्या.
- **वर्ष २००७-०८ चा राज्याचा एकूण अर्थसंकल्प रु.८५ हजार ६३७ कोटी असताना २८ विभागांपैकी १३ विभागांचा रु. ३९ हजार ३६३ कोटी २३ लाखांचा अर्थसंकल्प चर्चेविना मंजूर करण्यात आला.**

## वर्ष २००७-०८ च्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान

**तक्ता क्र. ५** दिवसभराचा कालावधी, चर्चेसाठी आलेले विभाग व मागण्या तसेच उपस्थितांपैकी चर्चा केलेल्या सदस्यांची संख्या खालीलप्रमाणे. (रु. कोटीत)

| दिनांक | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | एकूण मागण्या | चर्चा झालेल्या मागण्या | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ एप्रिल २००७ | १. गृह विभाग | ५३६९.८५ | १० | १० | १७२ | ३१ | १८ |
| ४ एप्रिल २००७ | १. महसूल व वन विभाग | २११९.१३ | १२ | ९ | १८० | ३१ | १७.२२ |
| ५ एप्रिल २००७ | १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ११२९३.२६ | ५ | ४ | १६७ | २९ | १७.३६ |
| | २. आदिवासी विकास विभाग | १९६७.२७ | ९ | ८ | | | |
| | ३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग | २१०९.०४ | ८ | ७ | | | |
| ९ एप्रिल २००७ | १. सार्वजनिक बांधकाम विभाग | ४५४३.८१ | ११ | ९ | १५१ | ० गोंधळ | ० |
| | २. अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण | ३०२८.३२ | ५ | ५ | | | |
| १० एप्रिल २००७ | १. कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय | २९११.७८ | १५ | १३ | २०५ | ० गोंधळ | ० |
| | २. सहकार पणन व वस्त्रोद्योग | १२१८.६८ | ६ | ४ | | | |
| ११ एप्रिल २००७ | १. जलसंपदा विभाग | ८३९७.६० | ७ | ५ | २११ | २० | ९.४७ |
| | २. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | १८८७.४१ | ७ | ६ | | | |
| | ३. सार्वजनिक आरोग्य विभाग | १९२७.६८ | ५ | ५ | | | |
| १२ एप्रिल २००७ | १. नगर विकास विभाग | ३३९६.१६ | ८ | ६ | २०० | ७ | ३.५० |
| | २. उद्योग उर्जा व कामगार | ४३८४.२६ | १२ | ११ | | | |
| | ३. गृह निर्माण विभाग | ७३१.९४ | ६ | ४ | | | |
| **७ दिवस** | **१५** | **५५२८६.१९** | **१२६** | **१०६** | **१८४*** | **१६*** | **९.३६*** |

* सरासरी

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- वर्ष २००७-०८ मध्ये एकूण २८ विभागांपैकी १५ विभागांच्या १०६ मागण्या चर्चेसहित मंजूर झाल्या उर्वरित १३ विभागांच्या ९९ मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.
- ९ व १० एप्रिल २००७ रोजी सभागृहात झालेल्या गोंधळामुळे त्या दिवशीच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभाग, कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विभाग आणि सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांच्या एकूण रु. ११ हजार ७०२ कोटी ५९ लाखांच्या ३७ मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.

## हजारो कोटींच्या अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेस सदस्यांना सरासरी वेळ केवळ ५ मिनिटे!

तक्ता क्र. ६ :- वर्ष २००७-०८ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील अर्थसंकल्पीय कामकाज

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | सदस्यांना मिळालेली वेळ | संबंधित मंत्र्यांची उत्तरे | चर्चेत सहभागी सदस्य | प्रत्येक सदस्यास मिळालेला वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ एप्रिल २००७ | ८ ता. २३ मि. | ४ ता. ४५ मि. | ३ ता. ५० मि. | ५५ मि. | ३१ | ७ मि. |
| ४ एप्रिल २००७ | १० ता. ५९ मि. | ५ ता. २५ मि. | ४ ता. ३० मि. | ५५ मि. | ३१ | ९ मि. |
| ५ एप्रिल २००७ | ०८ ता. २२ मि. | ६ ता. २० मि. | ४ ता. ०० मि. | २ ता. २० मि. | २९ | ८ मि. |
| ९ एप्रिल २००७ | २७ मि. | ० | ० | ० | ० गोंधळ | ० मि. |
| १० एप्रिल २००७ | १ ता. ०१ मि. | ५ मि. | ० | ० | ० गोंधळ | ० मि. |
| ११ एप्रिल २००७ | १० ता. १३ मि. | ५ ता. ३६ मि. | ३ ता. ५० मि. | १ ता. ४६ मि. | २० | ११ मि. |
| १२ एप्रिल २००७ | ९ ता. ४५ मि. | ५० मि. | ३० मि. | २० मि. | ७ | ४ मि. |
| ७ दिवस | ४९ ता. १० मि. | २६ ता. ०१ मि. | १६ ता. ४०मि. | ६ ता. १६ मि. | १६* | ५ मि.* |

*सरासरी

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००७-०८*

- १५ विभागांच्या १०६ मागण्या जरी चर्चेसहित मंजूर झाल्या असल्या तरी ५५ हजार २८६ कोटी १९ लाखांचा अर्थसंकल्प असलेल्या विभागांच्या चर्चेसाठी एकूण २६ तास इतकाच वेळ देण्यात आला होता.
- अनुदानाच्या मागण्यावरील चर्चेत इतर सदस्यांना एकूण १६ तास ४० मिनिटे वेळ दिला गेला म्हणजेच एका सदस्याला सरासरी केवळ ५ मिनिटे मिळाली होती.
- **रु. ५५,२८६ कोटी १९ लाखांच्या अर्थसंकल्पावर केवळ २६ तास १ मिनिटे चर्चा झाली होती म्हणजेच विधिमंडळाने एका मिनिटामध्ये रु.३५ कोटी ४१ लाख ७१ हजारांचा अर्थसंकल्प मंजूर केला होता.**

# मार्च / एप्रिल २००८-०९ अर्थसंकल्पीय अधिवेशन

## सर्वसाधारण चर्चेसाठी सरासरी उपस्थिती २३४ सदस्यांची तर प्रत्यक्ष सहभाग मात्र ४१ सदस्यांचा

तक्ता क्र. ७ : वर्ष २००८-०९ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २५ मार्च ०८ | ८ ता. १८ मि. | ४ ता.४५ मि. | १ता.२० मि. | ३ ता २५ मि. | | २२३ | ८ | २५ मि. | ३.५८ |
| २६ मार्च ०८ | ८ ता. ५१ मि. | ५ ता.४० मि. | - | ४ ता. ३० मि. | १ता १० मि. | २४६ | ३३ | ८ मि. | १३.४१ |
| २ दिवस | १७ ता.०९मि. | १०ता.२५ मि. | १ता.२० मि. | ७ ता. ५५ मि. | १ता १० मि. | २३४* | ४१ | १६ मि. | ८.४९* |

* *सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००८-०९*

- वर्ष २००८-०९ मध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा १० तास २५ मिनिटे झाली होती ज्यात ४१ सदस्यांनी भाग घेतला होता व त्यांना सरासरी प्रत्येकी केवळ १६ मिनिटे भाषणासाठी मिळाली होती तर सदस्यांचा सरासरी सहभाग हा ८ टक्के होता.

## ४२ हजार २९७ कोटी ७४ लाख रुपयांचा अर्थसंकल्प चर्चेविना मंजूर

तक्ता क्र. ८ :- वर्ष २००८-०९ मध्ये चर्चेला न आलेले विभाग व विभागाचा अर्थसंकल्प (रु. कोटीत)

| विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|
| वित्त विभाग | ३२४४८.७१ | महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय | ५८.५१ | विधि व न्याय | ४९७.५४ |
| नियोजन विभाग | ६४७६.०३ | सामान्य प्रशासन | ३८४.२४ | संसदीय कार्य | १.०० |
| अन्न नागरी पुरवठा | २४३१.७१ | | | | |
| एकूण | | | | | ४२,२९७.७४ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- **वर्ष २००८-०९ मध्ये राज्य अर्थसंकल्प रु. ९९ हजार ५६३ कोटी असताना एकूण ७ विभागांचा रु. ४२ हजार २९७ कोटी ७४ लाखांचा अर्थसंकल्प चर्चेविना मंजूर करण्यात आला.**

## गृह विभागाच्या ४ हजार १८९ कोटी ७५ लाख रुपयांच्या मागण्या गोंधळात मंजूर

**तक्ता क्र.** ९ वर्ष २००८-०९ च्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (रु. कोटीत)

| दिनांक | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | एकूण मागण्या | चर्चा झालेल्या मागण्या | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च ०८ | १. गृह विभाग | ४१८९.७५ | १० | १० | १५८ | ० (गोंधळ) | ० |
| १ एप्रिल ०८ | १. शालेय शिक्षण व क्रीडा | १३१५५.०२ | ५ | ४ | १९६ | १५ | ७.६५ |
| | २. नगर विकास विभाग | ३८६४.३३ | ८ | ६ | | | |
| २ एप्रिल ०८ | १. ग्राम विकास व जलसंधारण | ४६९१.६५ | १० | ८ | २०७ | ३१ | १५ |
| | २.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | २८५८.३२ | ५ | ४ | | | |
| ३ एप्रिल ०८ | १. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण. | १९५६.३२ | ५ | ५ | २०२ | १ | ०.५० |
| | २. पर्यावरण विभाग | ५.६२ | ५ | ४ | | | |
| ७ एप्रिल ०८ | १. महिला व बाल विकास | १०४३.०० | ४ | ४ | १६२ | २० | १२.३४ |
| | २. रोजगार व स्वयंरोजगार | ३१.८५ | ४ | ४ | | | |
| | ३. महसूल व वन | १९१३.८१ | १२ | ८ | | | |
| ८ एप्रिल ०८ | १. आदिवासी विकास | २३२५.६४ | ९ | ८ | २०३ | ४८ | २३.६४ |
| | २. सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ९३३.८१ | ६ | ४ | | | |
| | ३. जलसंपदा | ९२३२.१० | ७ | ५ | | | |
| | ४. पाणी पुरवठा व स्वच्छता | ८२८.७८ | ७ | ६ | | | |
| ९ एप्रिल ०८ | १. कृषि,पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय | २६१४.१३ | १३ | ११ | २०५ | ३५ | १७ |
| | २. सार्वजनिक बांधकाम. | ४६०७.६८ | ११ | ९ | | | |
| | ३. उद्योग उर्जा व कामगार विभाग | ३७८७.२१ | १२ | ३ | | | |
| १० एप्रिल०८ | १. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये | ७७२.०४ | ५ | ५ | २०४ | २ | ०.९८ |
| | २. उच्च व तंत्र शिक्षण | २४८८.९४ | ९ | ८ | | | |
| | ३. गृह निर्माण विभाग | १८८८.९९ | ६ | ५ | | | |
| | ४. पर्यटन व सांस्कृतिक कार्य | ११५.१२ | ५ | ५ | | | |
| ८ दिवस | २१ विभाग | ६३३०४.११ | १५८ | १२६ | १९२* | १९* | ९.६३* |

** सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- एकूण २८ विभागांपैकी २१ विभागांच्या १२६ मागण्या चर्चेसहित मंजूर झाल्या उर्वरित ७ विभागांच्या ११५ मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.
- **३१ मार्च २००८ रोजी झालेल्या गोंधळामध्ये गृह विभागाच्या रु.४ हजार १८९ कोटी ७५लाखांच्या १० मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.**
- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या रु. १ हजार ९५६ कोटी ३२ लाखांच्या तसेच पर्यावरण विभागाच्या रु. ५ कोटी ६२ लाखांच्या मागण्या ३ एप्रिल २००८ रोजी फक्त १५ मिनिटांच्या चर्चेत मंजूर करण्यात आल्या त्यावर केवळ एका सदस्याने ५ मिनिटे भाषण केले.
- आदिवासी विकास विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, जलसंपदा व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागांच्या रु. १३ हजार ३२० कोटी ३३ लाखांच्या मागण्या केवळ ३ तास ३५ मिनिटांच्या चर्चेनंतर मंजूर झाल्या ज्यामध्ये प्रत्येक सदस्यास केवळ ३ मिनिटे वेळ मिळाला होता.
- वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, गृह निर्माण व पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागांच्या एकूण ५ हजार २६५ कोटी ९ लाखांच्या मागण्या केवळ ५० मिनिटांच्या चर्चेत मंजूर झाल्या त्यात २ सदस्यांनी ३५ मिनिटे तर संबंधित मंत्र्यांनी १५ मिनिटे भाषण केले.

## ६३ हजार ३०४ कोटी ११ लाख रुपयांच्या मागण्यांवरील चर्चेसाठी सदस्यांना सरासरी वेळ ८ मिनिटे !

**तक्ता क्र.** १० वर्ष २००८-०९ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील अर्थसंकल्पीय कामकाज

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | सदस्यांना मिळालेली वेळ | संबंधित मंत्र्यांची उत्तरे | चर्चेत सहभागी सदस्य | प्रत्येक सदस्यास मिळालेला वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च ०८ | ५ ता. २१ मि. | १ ता. ०५ मि. | ० | - | ० ( गोंधळ ) | ० मि. |
| १ एप्रिल ०८ | ५ ता. ४७ मि. | ३ ता. २५ मि. | ३ ता २३ मि. | २ मि. | १५ | १३ मि. |
| २ एप्रिल ०८ | ९ ता. २७ मि. | ६ ता. ५५ मि. | ५ ता ४० मि. | १ ता १५ मि. | ३१ | ११ मि. |
| ३ एप्रिल ०८ | ३ ता. ५० मि. | १५ मि. | ५ मि. | १० मि. | १ | ५ मि. |
| ७ एप्रिल ०८ | ७ ता. ३८ मि. | ४ ता. १५ मि. | ३ ता. ३५ मि. | ४० मि. | २० | १० मि. |
| ८ एप्रिल ०८ | १२ ता. ०७ मि. | ३ ता. ३५ मि. | २ ता. २५ मि. | १ ता १० मि. | ४८ | ३ मि. |
| ९ एप्रिल ०८ | ११ ता. ४० मि. | ६ ता. १० मि. | ४ ता १० मि. | २ ता ०० मि. | ३५ | ७ मि. |
| १० एप्रिल०८ | ६ ता. ५१ मि. | ५० मि. | ३५ मि. | १५ मि. | २ | १७ मि. |
| **८ दिवस** | **६२ ता. ४१ मि.** | **२६ ता. ३० मि.** | **१९ ता. ५३ मि.** | **५ ता. ३२ मि.** | १९* | ८ मि.* |

* *सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००८-०९*

* एकूण रु.६३ हजार ३०४ कोटी ११ लाखांच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर सुमारे २६ तास ३० मिनिटे चर्चा झाली म्हणजेच एका मिनिटाला सुमारे रु.३९ कोटी ८१ लाख ३९ हजार ५६ रुपयांवर चर्चा झाली.
* अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत एका सदस्याला ८ दिवसात सरासरी केवळ ८ मिनिटे वेळ मिळाला होता.
* १ एप्रिल २००८ रोजी झालेल्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व नगर विकास विभागाच्या मागण्यांवर केवळ ३ तास २५ मिनिटे चर्चा झाली त्यातही संबंधित मंत्र्यांनी उत्तर देण्यास केवळ २ मिनिटे घेतली म्हणजेच शिक्षण विभागाच्या १३ हजार १५५ कोटी २ लाखांच्या मागण्यांना फक्त एका मिनिटात उत्तर देण्यात आले होते यावरून राज्यातील मुलांच्या शिक्षणाबाबत शासन किती गंभीर आहे हे दिसून येते.

## मार्च २००९-१० अर्थसंकल्पीय अधिवेशन

**तक्ता क्र. ११** : वर्ष २००९-१० च्या अंतरिम अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८ मार्च २००९ | ७ ता. ५२ मि. | २ ता २५ मि. | १ ता ३५ मि. | ५० मि. | - | २०९ | ३ | १६ मि. | १.४३ |
| १९ मार्च २००९ | ७ ता. ४१ मि. | ४ ता २५ मि. | - | ३ ता २० मि. | १ ता ०५ मि. | १८८ | ७ | २८ मि. | ३.७२ |
| २ दिवस | १५ ता. ३३ मि. | ६ता. ५० मि. | १ ता ३५ मि. | ४ ता. १० मि. | १ ता ०५ मि. | १९८* | १० | २२ मि. | २.५७* |

**सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००९-१०*

* वर्ष २००९-१० ची अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा ६ तास ५० मिनिटे चालली असून त्यात केवळ १० सदस्यांनीच सहभाग घेतला होता, तर त्यांची सरासरी उपस्थिती पाहता त्यांचा सहभाग फक्त २ टक्के होता.

## अतिरिक्त अर्थसंकल्प जून २००९-१० अर्थसंकल्पीय अधिवेशन

**तक्ता क्र.** १२: वर्ष २००९-१०च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा :

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | चर्चेत सहभागी सदस्य | उपस्थित सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ जून २००९ | ८ ता. १७ मि. | २ ता ४० मि. | १ ता ४० मि. | १ता. ००मि. | - | ३ | १६६ | २० मि. | १.८० |
| ९ जून २००९ | १२ ता. ५९ मि. | ५ता ३० मि. | - | ४ ता ३० मि. | १ ता. (दि १०/६/०९) | १३ | १९६ | २० मि. | ६.६३ |
| २ दिवस | २१ता. १६ मि. | ८ता. १० मि. | १ ता ४० मि. | ५ ता.३० मि. | १ ता. ० मि. | १६ | १८१* | २० मि. | ४.२१* |

* *सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००९-१०*

- **वर्ष २००९-१० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत सदस्यांचा सरासरी सहभाग फक्त ४ टक्के असल्याकारणाने त्यांना सरासरी वेळ हा २० मिनिटे मिळाला होता.**

**तक्ता क्र.** १३ : वर्ष २००९-१० मध्ये चर्चेला **न** आलेले विभाग व विभागाचा अर्थसंकल्प

रु. कोटीत

| विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|
| विधि व न्याय | ७१६.९३ | महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय | ६७.७२ | सामाजिक न्याय | २६०१.३८ |
| संसदीय कार्य | १.२२ | ग्राम विकास व जलसंधारण | ३०८१.८५ | नियोजन विभाग | १८८५९.५३ |
| अल्पसंख्यांक विकास | ५९.४४ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | ९७.५५ | पर्यावरण | ४.१९ |
| | | एकूण | | | २५,४८९.८१ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- **वर्ष २००९-१० चा राज्य अर्थसंकल्प १ लाख २२ हजार ९६३ कोटी असताना एकूण ९ विभागांचा रु. २५ हजार ४८९ कोटी ८१ लाखांचा अर्थसंकल्प चर्चेविना मंजूर करण्यात आला.**
- ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या रु. ३०८१.८५ कोटींच्या, अल्पसंख्यांक विभागाच्या रु.५९.४४ कोटींच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या रु.२६०१.३८ कोटींच्या, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या रु.९७.५५ कोटींच्या आणि पर्यावरण विभागाच्या रु. ४.१९ कोटींच्या मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या होत्या.

तक्ता क्र. १४ : वर्ष २००९-१० च्या अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान

रु. कोटीत

| दिनांक | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | एकूण मागण्या | चर्चा झालेल्या मागण्या | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १० जून २००९ | १. महसूल व वन विभाग | २१८४.०० | १२ | ९ | १९३ | १ (गोंधळ) | ०.५० |
| | २. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | १७३२९.९३ | ५ | ४ | | | |
| | ३. सार्वजनिक बांधकाम विभाग | ४०११.०२ | ११ | ९ | | | |
| | ४. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | ९७५.११ | ५ | ४ | | | |
| | ५. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ७१३.६९ | ७ | ६ | | | |
| | ६. रोजगार व स्वयंरोजगार | ३१.३८ | ४ | ४ | | | |
| ११ जून २००९ | १. सामान्य प्रशासन विभाग | ७३६.१८ | ८ | ८ | १९५ | १७ | ९ |
| | २. कृषि पशु संवर्धन दुग्ध व मत्स्यव्यवसाय | २७२२.४३ | १४ | १२ | | | |
| | ३. नगर विकास विभाग | २२८६.०२ | ७ | ५ | | | |
| | ४. उद्योग, उर्जा,कामगार विभाग | ३९७३.८४ | १२ | ९ | | | |
| | ५. अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | २५७४.९५ | ५ | ५ | | | |
| | ६. गृह निर्माण | ७३५.९० | ६ | ४ | | | |
| | ७. आदिवासी विकास विभाग | १४१८.४० | ९ | ६ | | | |
| १२ जून २००९ | १. गृह विभाग | ५१७१.६७ | १० | १० | १७५ | १५ | ८.५७ |
| | २. वित्त विभाग | ३०२३२.९५ | ९ | ७ | | | |
| | ३. जलसंपदा विभाग | ५४५९.१६ | ७ | ५ | | | |
| | ४. सार्वजनिक आरोग्य विभाग | २०९३.०८ | ५ | ५ | | | |
| | ५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग | ३२९८.०९ | ६ | ४ | | | |
| | ६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग | २८७५.९४ | ९ | ६ | | | |
| | ७. महिला व बाल विकास विभाग | ६७९.७५ | ४ | ४ | | | |
| ३ दिवस | २० | ८९५०३.४९ | १५५ | १२६ | १८७* | ११* | ६* |

* सरासरी

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- १० जून २००९ रोजी महसूल व वन विभाग, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग या सहा विभागांचा एकूण अर्थसंकल्प रु. २५ हजार २४५ कोटी १० लाखांचा असताना त्यांच्या ४४ मागण्यांपैकी ३६ मागण्या केवळ ३० मिनिटात **गोंधळामध्ये** मंजूर झाल्या आणि त्यातही एका सदस्यानेच ३० मिनिटे भाषण केले होते.
- एकूण २० विभागांच्या रु.८९,५०३ कोटी ४९ लाखांच्या १५५ मागण्यांपैकी १२६ मागण्या चर्चिल्या गेल्या तर उर्वरित ९ विभागांच्या रु.२५,४८९ कोटी ८१ लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या होत्या.
- **रु. ८९,५०३ कोटी ४९ लाखांच्या मागण्या केवळ ३ दिवसात मंजूर करण्यात आल्या ज्यामध्ये मागण्यांवरील चर्चा केवळ ७ तास ४० मिनिटे चालली होती.**
- **मागण्यांवरील चर्चेत सदस्यांचा सरासरी सहभाग हा केवळ ६ टक्के होता तर प्रत्येक सदस्यास सरासरी १७ मिनिटे बोलण्यास मिळाली होती.**

तक्ता क्र. १५ : वर्ष २००९-१०च्या अनुदानाच्या मागण्यांवरील अर्थसंकल्पीय कामकाज

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | सदस्यांना मिळालेली वेळ | संबंधित मंत्र्यांची उत्तरे | चर्चेत सहभागी सदस्य | प्रत्येक सदस्यास मिळालेला वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १० जून २००९ | ३ ता. ५६ मि. | ० ता. ३० मि. | ० ता. ३० मि. | - | १ (गोंधळ) | ३० मि. |
| ११ जून २००९ | १३ ता. १४ मि. | ४ ता. १० मि. | ३ ता. २५ मि. | ४५ मि. | १७ | १२ मि. |
| १२ जून २००९ | ७ ता. ५३ मि. | ३ ता .०० मि. | २ ता ४० मि. | २० मि. | १५ | १० मि. |
| **३ दिवस** | **२५ ता. ०३ मि.** | **७ ता.४० मि.** | **६ ता.३५ मि.** | **१ ता. ०५ मि.** | **११*** | **१७ मि.*** |

** सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २००९-१०*

# मार्च / एप्रिल २०१०-११ अर्थसंकल्पीय अधिवेशन

## अर्थसंकल्पावर चर्चा करण्यास सदस्यांना मिळतात केवळ ८ मिनिटे!

**तक्ता क्र. १६** : वर्ष २०१०-११ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा :

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | चर्चेत सहभागी सदस्य | उपस्थित सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ मार्च २०१० | ८ ता. १३ मि. | ५ ता ०३ मि. | ४५ मि. | ४ ता ०८ मि. | - | २२ | १९० | ११ मि. | १२ |
| ३० मार्च २०१० | ७ ता. ०८ मि. | ४ ता ४० मि. | - | ३ ता ३५ मि. | १ ता.०० मि. | ३२ | १९६ | ६ मि. | १६ |
| **२ दिवस** | **१५ ता. २१ मि.** | **९ ता. ४३ मि.** | **४५ मि.** | **७ता. ४३ मि.** | **१ता. ०० मि.** | **५४** | **१९३*** | **८ मि.** | **१४*** |

** सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २०१०-११*

- **वर्ष २०१०-११ मध्ये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत सदस्यांचा सरासरी सहभाग १४ टक्के असला तरी त्यांना सरासरी वेळ मात्र फक्त ८ मिनिटे मिळाली होती.**

## ८ हजार ८४६ कोटी ४६ लाखांच्या मागण्या चर्चेविना मंजूर

**तक्ता क्र. १७** : वर्ष २०१०-११ मध्ये चर्चेला न आलेले विभाग व विभागाचा अर्थसंकल्प

रु. कोटीत

| विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|
| विधि व न्याय | ८६५.४२ | महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय | ८०.९३ | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | १६७.६५ |
| पर्यावरण | १४.७६ | ग्राम विकास व जलसंधारण | ३६३२.०४ | रोजगार व स्वयंरोजगार | ३२.७० |
| संसदीय कार्य | १.३८ | अल्पसंख्यांक विकास | २१०.३२ | अन्न व नागरी पुरवठा | ३८४१.२६ |
| एकूण | | | | | ८८४६.४६ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- वर्ष २०१०-११ ला राज्याचा एकूण अर्थसंकल्प रु. १ लाख २९ हजार ५०० कोटी असताना ९ विभागांचा रु. ८ हजार ८४६ कोटी ४६ लाखांच्या अर्थसंकल्पावर चर्चाच झाली नाही.
- **एकूण रु. ८ हजार ८४६ कोटी ४६ लाखांचा अर्थसंकल्प विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.**
- ग्रामविकास व जलसंधारण विभाग, पर्यावरण विभाग, अल्पसंख्यांक विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, रोजगार व स्वयंरोजगार विभाग आणि अन्न व नागरी पुरवठा विभाग इत्यादी महत्त्वाच्या विभागांवर चर्चा झाली नव्हती.

## एकूण रु. १ लाख २६ हजार ४१३ कोटी ६४ लाखांच्या मागण्यांवरील चर्चेत १६ टक्के सदस्यांचा सहभाग!

**तक्ता क्र. १८ :** वर्ष २०१०-११ च्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान

रु. कोटीत

| दिनांक | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | एकूण मागण्या | चर्चा झालेल्या मागण्या | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०१० | १. गृह निर्माण विभाग | १७९५.३२ | ६ | ४ | २०१ | ३२ | १६ |
| | २. सहकार पणन व वस्त्रोद्योग | ८४१.३९ | ६ | ४ | | | |
| १ एप्रिल २०१० | १. सार्वजनिक आरोग्य विभाग | २९६२.३२ | ५ | ५ | १९० | ४२ | २२ |
| | २. पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | ७५०.५१ | ७ | ६ | | | |
| ५ एप्रिल २०१० | १. नगर विकास विभाग | ४२०१.९० | ७ | ५ | १९५ | ३७ | १९ |
| | २. कृषी पशुसंवर्धन दुग्ध व मत्स्यव्यवसाय | ३३६२.८९ | १४ | १२ | | | |
| ६ एप्रिल २०१० | १. जलसंपदा विभाग | १०५८७.६६ | ७ | ५ | २०६ | २४ | १२ |
| | २. महिला व बालविकास विभाग | ११०९.४१ | ४ | ४ | | | |
| ७ एप्रिल २०१० | १. महसूल व वन विभाग | २९४३.९४ | १२ | ९ | २०० | ३६ | १८ |
| | २. उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ३४३१.९७ | ९ | ८ | | | |
| १२ एप्रिल २०१० | १. सार्वजनिक बांधकाम विभाग | ५३२०.४७ | ११ | ९ | १७९ | ३४ | १९ |
| | २. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये | १०९१.७२ | ५ | ५ | | | |
| १३ एप्रिल २०१० | १. सामान्य प्रशासन विभाग | ५४४.३३ | ८ | ८ | १८८ | २८ | १५ |
| | २. गृह विभाग | ७२८६.३८ | १० | १० | | | |
| १५ एप्रिल २०१० | १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | २४१०८.०० | ५ | ३ | १९१ | २५ | १३ |
| | २. उद्योग उर्जा व कामगार | ५२३८.०५ | १२ | ११ | | | |
| १६ एप्रिल २०१० | १. वित्त विभाग | ३११४८.०३ | १० | ७ | १८८ | ३२ | १७ |
| | २. नियोजन विभाग | ९९१९.७५ | ८४ | ८३ | | | |
| | ३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य | ५१२५.३२ | ५ | ४ | | | |
| | ४. आदिवासी विकास विभाग | ३८४४.२८ | ९ | ७ | | | |
| **९ दिवस** | २० | १२६४१३.६४ | २३६ | २०९ | १९३* | ३२* | १६* |

** सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- विभागवार अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत २० विभागांच्या एकूण रु. १ लाख २६ हजार ४१३ कोटी ६४ लाखांच्या २३६ मागण्यांपैकी २०९ मागण्यांवर ५६ तास १० मिनिटे चर्चा झाली ज्यात सदस्यांसाठी ४० तास ५ मिनिटे वेळ देण्यात आला होता.

## एका मिनिटाला ३७ कोटी ५१ लाख १४ हजार रुपयांचा अर्थसंकल्प मंजूर!

तक्ता क्र. १९ :- वर्ष २०१०-११ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील अर्थसंकल्पीय कामकाज

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | सदस्यांना मिळालेली वेळ | संबंधित मंत्र्यांची उत्तरे | चर्चेत सहभागी सदस्य | प्रत्येक सदस्यास मिळालेला वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०१० | ९ ता. ५७ मि. | ६ ता. ४० मि. | ४ ता. ३० मि. | २ ता. १० मि. | ३२ | ८ मि. |
| १ एप्रिल २०१० | ८ ता. ०२ मि. | ५ ता. ५५ मि. | ४ ता. ३५ मि. | १ ता. २० मि. | ४२ | ६ मि. |
| ५ एप्रिल २०१० | १० ता. ०६ मि. | ७ ता. १५ मि. | ५ ता. २० मि. | ३५ मि. | ३७ | ८ मि. |
| ६ एप्रिल २०१० | ८ ता. २१ मि. | ५ ता. ४५ मि. | ४ ता. २५ मि. | १ ता. २० मि. | २४ | ११ मि. |
| ७ एप्रिल २०१० | ९ ता. ५२ मि. | ५ ता. ५५ मि. | ४ ता. २० मि. | १ ता. ३५ मि. | ३६ | ७ मि. |
| १२ एप्रिल २०१० | ९ ता. २१ मि. | ४ ता. ३० मि. | ३ ता. ००मि. | १ ता. ३० मि. | ३४ | ५ मि. |
| १३ एप्रिल २०१० | १० ता. ५१ मि. | ६ ता. ४५ मि. | ५ ता. ०५ मि. | १ ता. ४० मि. | २८ | ११ मि. |
| १५ एप्रिल २०१० | १० ता. ५० मि. | ७ ता. २५ मि. | ४ ता. ३५ मि. | २ ता. ५० मि. | २५ | ११ मि. |
| १६ एप्रिल २०१० | १० ता. २७ मि. | ६ ता. ००मि. | ४ ता. १५ मि. | १ ता. ४५ मि. | ३२ | ११ मि. |
| ९ दिवस | ८७ ता. ४७ मि. | ५६ ता. १० मि. | ४० ता. ०५ मि. | १४ ता. ४५ मि. | ३२* | ८ मि.* |

*सरासरी

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २०१०-११*

- सार्वजनिक बांधकाम विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये या विभागांचा एकूण अर्थसंकल्प रु. ६ हजार ४१२ कोटी १९ लाख असताना त्यांच्या एकूण १६ पैकी १४ मागण्यांवर ४ तास ३० मिनिटे चर्चा झाली होती त्यातील ३ तास सदस्यांना मिळाले होते तर १ तास ३० मिनिटे संबंधित मंत्र्यांनी उत्तरासाठी घेतले होते. चर्चेत एकूण ३४ सदस्यांनी सहभाग घेताला होता व प्रत्येकी भाषणासाठी केवळ ५ मिनिटे मिळाली होती.
- **एकूण रु. १ लाख २६ हजार ४१३ कोटी ६४ लाखांच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर ५६ तास १० मिनिटे चर्चा झाली म्हणजेच एका मिनिटाला रु. ३७ कोटी ५१ लाख १४ हजारांचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला.**

# मार्च / एप्रिल २०११-१२ अर्थसंकल्पीय अधिवेशन

## अर्थसंकल्पावरील चर्चेत उपस्थित सदस्यांपैकी १० टक्के सदस्यांचा देखील सहभाग नाही.

**तक्ता क्र. २० :** वर्ष २०११-१२ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | विरोधी पक्ष नेत्यांची भाषणाची वेळ | इतर सदस्यांना मिळालेली वेळ | वित्तमंत्र्यांचे उत्तर | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | इतर सदस्यांना मिळालेला सरासरी वेळ | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ मार्च २०११ | ९ ता. १८ मि. | ६ ता. ४० मि. | १ ता. ५ मि. | ५ ता २५ मि. | - | २०९ | २९ | ११ मि. | १३.८७ |
| ३१ मार्च २०११ | १३ ता.४९ मि. | ३ ता. ५५ मि. | - | २ ता.२० मि. | १ता.२० मि. | २१५ | १२ | ११ मि. | ५.५८ |
| २ दिवस | २३ ता.०७ मि. | १० ता.३५ मि. | १ ता. ५ मि. | ७ ता.४५ मि. | १ ता.२० मि. | २१२* | ४१ | ११ मि. | ९.७२* |

**सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २०११-१२*

- वर्ष २०११-१२ मध्ये सर्वसाधारण चर्चा १० तास ३५ मिनिटे झाली मात्र सदस्यांची सरासरी उपस्थिती फक्त १० टक्के होती.
- प्रत्येक सदस्यास सरासरी केवळ ११ मिनिटे मिळाली होती.
- **रु. १ लाख ५४ हजार १२४ कोटींच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत सरासरी २१२ सदस्यांनी उपस्थिती दर्शवली होती तर चर्चा १० तास ३५ मिनिटे चालली होती.**

## १ हजार १८९ कोटी १३ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पावर चर्चा नाही.

**तक्ता क्र. २१** वर्ष २०११-१२ मध्ये चर्चेला न आलेला विभाग व विभागाचा अर्थसंकल्प: रु. कोटीत

| विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|---|
| विधि व न्याय | १०६०.७४ | महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालय | १२६.८९ | संसदीय कार्य | १.५० |
| एकूण | | | | | ११८९.१३ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- **वर्ष २०११-१२ चा राज्य अर्थसंकल्प रु. १ लाख ५४ हजार १२४ कोटी तर वरील ३ विभागांच्या रु. १ हजार १८९ कोटी १३ लाखांचा अर्थसंकल्पावर चर्चा नाही.**

## वर्ष २०११-१२ अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चा व मतदान

**तक्ता क्र.** २२: दिवसभराचा कालावधी चर्चेसाठी आलेले विभाग व मागण्या तसेच उपस्थितांपैकी चर्चा केलेल्या सदस्यांची संख्या खालीलप्रमाणे. रु. कोटीत

| दिनांक | विभाग | विभागाचा अर्थसंकल्प | एकूण मागण्या | चर्चा झालेल्या मागण्या | उपस्थित सदस्य | चर्चेत सहभागी सदस्य | सहभागी सदस्यांची उपस्थितीशी % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०११ | गृह विभाग | ८२९२.७५ | १२ | ११ | २१५ | १२ | ५.५८ |
| | कृषि, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय | ४०२३.७८ | १४ | १० | | | |
| ५ एप्रिल २०११ | सामान्य प्रशासन विभाग | ९७३.७० | ९ | ८ | १८३ | ३४ | १८.५७ |
| | नगर विकास | ५६५५.५६ | ८ | ६ | | | |
| | गृह निर्माण | १८९४.६६ | ६ | ४ | | | |
| | मराठी भाषा | ९.९४ | ४ | ४ | | | |
| ६ एप्रिल २०११ | वित्त विभाग | ३७४५७.२५ | ९ | ७ | २२० | ३० | १३.६३ |
| | नियोजन विभाग | ९४२३.१४ | ४८ | ४८ | | | |
| | अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण | ४३७७.४० | ६ | ६ | | | |
| | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये | १३०४.३२ | ५ | ५ | | | |
| | रोजगार व स्वयंरोजगार | ४५.४९ | ४ | ४ | | | |
| ७ एप्रिल २०११ | महसूल व वन विभाग | ३३६७.०६ | १२ | ९ | २१६ | ५० | २३.१४ |
| | पर्यावरण | १७.६१ | ५ | ४ | | | |
| | ग्रामविकास व जलसंधारण | ५६१४.२७ | ९ | ६ | | | |
| ८ एप्रिल २०११ | उद्योग उर्जा व कामगार | ६४६९.२३ | १३ | ११ | २०० | २२ | ११.०० |
| | सहकार पणन व वस्त्रोद्योग | ९२३.५४ | ६ | ४ | | | |
| | अल्पसंख्यांक विकास | २६८.४१ | ३ | ३ | | | |
| ९ एप्रिल २०११ | उच्च व तंत्र शिक्षण | ४३४२.९९ | ९ | ८ | ११८ | २८ | २३.७२ |
| | सार्वजनिक आरोग्य | ३३६२.२८ | ५ | ४ | | | |
| ११ एप्रिल २०११ | शालेय शिक्षण | २७७८७.६२ | ५ | ३ | १५३ | ४७ | ३०.७१ |
| | जलसंपदा | ११८३५.३३ | ७ | ५ | | | |
| | सामाजिक न्याय | ६६३७.४२ | ५ | ४ | | | |
| | आदिवासी विकास | ४७४७.४४ | ९ | ७ | | | |
| १३ एप्रिल २०११ | सार्वजनिक बांधकाम | ७८८०.७२ | ११ | ९ | १५५ | ३७ | २३.८७ |
| | महिला व बाल विकास | २४५३.९६ | ४ | ४ | | | |
| | पाणी पुरवठा व स्वच्छता | ११३५.७२ | ७ | ६ | | | |
| | पर्यटन व सांस्कृतिक कार्य | ३४४.६० | ६ | ६ | | | |
| ८ दिवस | २७ विभाग | १६०६४६.१९ | २४१ | २०६ | १८२* | ३२* | १८.७७* |

* *सरासरी*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अंदाजपुस्तिका*

- **मागण्यांवरील चर्चेत २७ विभागांचा रु. १ लाख ६० हजार ६४६ कोटी १९ लाखांचा अर्थसंकल्प चर्चिला गेला ज्यात सदस्यांचा सरासरी सहभाग हा केवळ १९ टक्के होता.**
- १३ एप्रिल २०११ रोजी झालेल्या चर्चेत सार्वजनिक बांधकाम, महिला व बाल विकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य या विभागांचा एकूण अर्थसंकल्प रु. ११ हजार ८१५ कोटी असताना त्यांच्या एकूण २८ मागण्यांपैकी २५ मागण्या चर्चिल्या गेल्या ज्यासाठी केवळ ३ ता ३५ मिनिटे वेळ देण्यात आला व त्यात सहभागी ३७ सदस्यांना प्रत्येकी केवळ ५ मिनिटे मिळाली होती.

## मागण्यांवरील चर्चेत सरासरी ३२ सदस्यांचा सहभाग

**तक्ता क्र.** २३ : वर्ष २०११-१२ च्या अनुदानाच्या मागण्यांवरील अर्थसंकल्पीय कामकाज :

| दिनांक | दिवसभराचा कालावधी | अर्थसंकल्पीय कामकाजाची वेळ | सदस्यांना मिळालेली वेळ | संबंधित मंत्र्यांची उत्तरे | चर्चेत सहभागी सदस्य | प्रत्येक सदस्यास मिळालेला वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१ मार्च २०११ | १३ ता. ४९ मि. | ७ ता. २५ मि. | ६ ता. १५ मि. | १ ता. १० मि. | १२ | ३१ मि. |
| ५ एप्रिल २०११ | ११ ता. ५३ मि. | ८ ता. ०० मि. | ६ ता. ५० मि. | १ ता. १० मि. | ३४ | १२ मि. |
| ६ एप्रिल २०११ | १० ता. ०८ मि. | ७ ता. २५ मि. | ५ ता. २० मि. | १ ता. ४० मि. | ३० | ११ मि. |
| ७ एप्रिल २०११ | १२ ता. ४३ मि. | ८ ता. ३५ मि. | ६ता. ३५ मि. | २ ता. ०० मि. | ५० | ०८ मि. |
| ८ एप्रिल २०११ | ११ ता. २१ मि. | ९ ता. १० मि. | ६ ता. ०५ मि. | ३ ता. ०५ मि. | २२ | १४ मि. |
| ९ एप्रिल २०११ | ०९ ता. ४२ मि. | ७ ता. ०५ मि. | ५ ता. २० मि. | १ ता. ४५ मि. | २८ | ११ मि. |
| ११ एप्रिल २०११ | १२ ता. ५९ मि. | ९ ता. ०५ मि. | ६ ता. ५५ मि. | २ ता. १० मि. | ४७ | ०७ मि. |
| १३ एप्रिल २०११ | १४ ता. ०८ मि. | ३ ता. ३५ मि. | २ ता. ५५ मि. | ४० मि. | ३७ | ०५ मि. |
| **८ दिवस** | **९६ ता ४३मि.** | **६० ता. २०मि.** | **४६ ता१५मि.** | **१३ ता. ४०मि.** | **३२*** | **१२ मि.*** |

*सरासरी

*स्रोत : संक्षिप्त अहवाल व अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा इतिवृत्तांत वर्ष २०११-१२*

- वर्ष २०११-१२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी सदस्यांना २७ विभागांच्या मागण्यांवर भाषण करताना सरासरी १२ मिनिटे बोलण्यास मिळाली होती .
- **एकूण ६० ता. २० मिनिटामध्ये २७ विभागांच्या एकूण २४० पैकी २०६ मागण्या चर्चिल्या गेल्या.**
- एकूण २७ विभागांच्या २४० मागण्यांपैकी २०६ मागण्या चर्चेसहित मंजूर झाल्या तर उर्वरित ३ विभागांच्या मागण्या चर्चारोधानंतर विनाचर्चा मंजूर करण्यात आल्या.

## शासनाच्या नियोजित कार्यक्रमांमध्ये पारदर्शकता येण्यासाठी अर्थसंकल्पीय चर्चेसोबत इतर आयुधांचा प्रभावी वापर होणे गरजेचे

राज्यशासन अर्थसंकल्पाच्या माध्यमातून आपल्या योजना, धोरणे व कार्यक्रमांची माहिती विधिमंडळासमोर ठेवत असते. मात्र अर्थसंकल्पातील अभिवचने पूर्ण होण्यासाठी त्या अर्थसंकल्पावर प्रभावी चर्चा होणे आवश्यक असते. परंतु या पुस्तिकेतील मागील काही वर्षाचा आढावा पाहता अर्थसंकल्पावरील चर्चा प्रभावी झालेली दिसत नाही, याचे कारण म्हणजे अर्थसंकल्पावरील चर्चेआधी सदस्यांना अर्थसंकल्प समजून घेण्यास व त्याचा अभ्यास करण्यास नियमानुसार पुरेसा वेळ दिला जात नाही. तसेच राज्याच्या धोरणांबाबत व कार्यक्रमांबाबत होणारी ही चर्चा अत्यंत अल्पावधीत व कधी कधी तर गोंधळातच आटोपती घेतली जाते. त्याचप्रमाणे सदस्यांचा चर्चेमध्ये दिसून येणारा सहभाग देखील अत्यल्प असतो.

विधिमंडळातील कामकाजामधील अर्थसंकल्प हा एक महत्त्वाचा विषय असला तरीही राज्यशासनाचा नियोजित कार्यक्रम सुव्यवस्थित चालावा, योजनांची व धोरणांची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी सदस्यांनी विधिमंडळाच्या इतर प्रभावी आयुधांचा वापर योग्यरित्या करणे देखील गरजेचे आहे. त्याचप्रमाणे विधिमंडळाने देखील या आयुधांवरील चर्चेसाठी नियमानुसार अपेक्षित कालावधी देणे अभिप्रेत आहे. जेणे करून विधिमंडळाचा शासनाच्या कार्यक्रमांवर अंकुश राहील व शासनाच्या कार्यक्रमांमध्ये पारदर्शकता देखील येईल. पुढील पृष्ठांमध्ये सदस्यांची उपस्थिती व विधिमंडळाची काही महत्त्वाची आयुधे उदा. तारांकित प्रश्न, लक्षवेधी, स्थगन प्रस्ताव यांचा अभ्यासपूर्ण आढावा घेण्यात आलेला आहे. तसेच या अभ्यासाअंती काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदविण्यात आलेली आहेत.

# अर्थसंकल्पीय अधिवेशनातील सदस्यांची उपस्थिती दुर्दैवाने कमीच

तक्ता क्र. २४ सदस्यांची उपस्थितीबाबत माहिती. (सदस्यांची संख्या)

| अधिवेशन | १०० % | ९९% ते ५१% | ५०% ते २५% | २५% व त्यापेक्षा कमी | एकूण सदस्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | १०० | ११५ | २३ | १२ | २५० |
| जुलै २०१० | ६७ | १५७ | २२ | ४ | २५० |
| मार्च २०१० | २९ | १९४ | १८ | ४ | २४५ |
| डिसेंबर २००९ | १११ | १०३ | २२ | ८ | २४४ |
| जून २००९ | ५३ | १५३ | २१ | ९ | २३६ |
| मार्च २००९* | १४४ | ५५ | २५ | २१ | २४५ |
| डिसेंबर २००८ | ६२ | १२३ | ३३ | ३१ | २४९ |
| जुलै २००८ | ७५ | १५० | १५ | ११ | २५१ |
| मार्च २००८ | १७ | १९८ | ३० | ५ | २५० |
| डिसेंबर २००७ | ६४ | १३१ | ३५ | १९ | २४९ |
| जुलै २००७ | १०३ | १३२ | ७ | ७ | २५४ |
| मार्च २००७ | १८ | १९८ | २५ | ९ | २५० |
| डिसेंबर २००६ | ७१ | ११६ | ५१ | ११ | २४९ |
| जुलै २००६ | ५७ | १६४ | २४ | ५ | २५० |
| मार्च २००६ | ३१ | १९५ | १७ | ६ | २४९ |
| डिसेंबर २००५ | १०० | ११३ | २१ | १२ | २४६ |
| जुलै २००५ | १२४ | १०९ | १३ | ४ | २५० |
| मार्च २००५ | ५० | १८३ | १४ | २ | २४९ |
| **एकूण** | १२७६ | २५८९ | ४१६ | १८० | ४४६६ |
| **प्रमाण** | २८.५७% | ५८% | ९.३१% | ४.०३ | |

**मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल*

अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्याची आर्थिक ध्येयधोरणे संमत केली जातात. राज्याच्या निधीचे विभागश: वाटप तसेच राज्याच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय गाठण्याच्या दृष्टिने महत्त्वाची धोरणे, योजना या अधिवेशनात संमत केल्या जातात. त्यामुळे इतक्या महत्त्वाच्या अधिवेशनामध्ये विधानसभा सदस्यांची १०० टक्के उपस्थिती वास्तविक पाहता आवश्यक आहे. मात्र वरील तक्ता पाहता मार्च २००९ चे अधिवेशन (जे निवडणुकांमुळे ४ दिवस चालले) वगळता, वर्ष २००५ ते २०१० या वर्षातील सर्व अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधानसभा सदस्यांची उपस्थिती दुर्दैवाने इतर अधिवेशनांच्या तुलनेत सर्वात कमी आहे.

## जनहिताशी निगडीत प्रश्नांना विधानसभेच्या पटलावर शेवटचे स्थान!

**प्रश्न** :

कार्यकारी प्रशासन यंत्रणेवर ( Executive Administration ) देखरेख ठेवण्यासाठी ( Surveillance ) जगातील प्रातिनिधिक संसदीय लोकशाही पध्दत अस्तित्वात असणाऱ्या ( Representative Parlimentary Democracy ) देशात **"प्रश्न"** या संसदीय आयुधाचा प्रभावीपणे वापर करण्याचे तंत्र विकसित झाले आहे. विधानसभेच्या बैठकीची सुरुवात प्रश्नोत्तरांच्या तासाने होते. राज्यातील जनतेच्या सार्वजनिक हिताच्या संदर्भात सदस्यांच्या निदर्शनास येणाऱ्या विविध तक्रारी, अडचणी, समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तसेच राज्याच्या शासन यंत्रणेद्वारे होत असलेल्या प्रशासनातील उणिवा दूर करून घेण्यासाठी किंवा या उणिवा शासनाच्या निदर्शनास आणण्यासाठी तथा शासनाची भूमिका समजावून घेण्यासाठी प्रश्नोत्तर पध्दतीचा उपयोग होतो. पर्यायाने या प्रश्नोत्तरामुळे शासनालाही प्रशासन यंत्रणेच्या कारभाराबाबत वा कार्यवाहीबाबत तसेच त्यातील उणिवा दूर करण्याच्या दृष्टिने माहिती मिळते. विधानमंडळात जे प्रश्न विचारले जातात त्यांचे तीन प्रकार असतात : १) तारांकित प्रश्न २) अल्प सूचना प्रश्न ३) अतारांकित प्रश्न.

- ज्या प्रश्नांना सभागृहात तोंडी उत्तर दिले जाते अशा प्रश्नांना तारांकित प्रश्न असे म्हणतात.
- तारांकित प्रश्नांची माहिती मिळविण्यास नियमाप्रमाणे जेवढा अवधी आवश्यक आहे त्यापेक्षा जास्त अवधी लागत असल्याची अध्यक्षांची खात्री झाल्यास असे प्रश्न अतारांकित म्हणून स्वीकृत करण्यात येतात
- ज्या प्रश्नात खास तक्रार नाही केवळ माहिती हवी असते किंवा सांख्यिकीय माहिती विचारली असेल असे प्रश्नही सामान्यत: अतारांकित प्रश्न म्हणून स्वीकृत केले जातात.
- प्रश्न तोंडी उत्तरासाठी तारांकित प्रश्नांच्या यादीत समाविष्ट होऊनही प्रश्नोत्तरांचा तास समाप्त झाल्यामुळे उत्तरीत होऊ शकत नाहीत असे प्रश्न देखील अतारांकित समजले जातात.

*स्त्रोत : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांकरिता मार्गदर्शिका*

## स्वीकृत तारांकित प्रश्नांपैकी मागील ५ वर्षात फक्त ६ टक्के प्रश्न चर्चेला

तक्ता क्र. २५ तारांकित प्रश्नांची सांख्यिकीय माहिती.

| अधिवेशन | आलेल्या प्रश्नांची संख्या | कार्यवाहीत घेतलेले प्रश्न | अस्वीकृत प्रश्न | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चा न झालेले | वेळेअभावी चर्चेला न आलेले | चर्चेला आलेले प्रश्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | १०१८९ | ८२८८ | ९९७ | ३३६१ | ११३३ | ० | १०९३ | ४० |
| जुलै २०१० | ७२०८ | ४९३५ | ७३७ | १८६९ | ५८८ | ० | ५४४ | ४४ |
| मार्च २०१० | १०८६४ | ९५६७ | १७७० | ३०२२ | ११७५ | २ | १०४१ | १३२ |
| डिसेंबर २००९ | ४०९६ | २९१८ | २७८ | १२७७ | ५४१ | ३ | ४९५ | ४३ |
| जून २००९ | ५८०८ | ४४२२ | ५६९ | १६१६ | ९१० | ४ | ८५० | ५६ |
| मार्च २००९* | - | - | - | - | - | - | - | - |
| डिसेंबर २००८ | ८४७५ | ६७६७ | ९०६ | २४०५ | ८९६ | ३ | ८५६ | ३७ |
| जुलै २००८ | ७६५३ | ५९७५ | ९२९ | १९०० | ६९६ | २ | ६६१ | ३३ |
| मार्च २००८ | १०२१६ | ९०९८ | १७३१ | ३२३२ | १६३२ | ६३ | १४२१ | १४८ |
| डिसेंबर २००७ | ७१०९ | ५७६१ | ७६४ | १९३७ | ६१५ | ३ | ५९२ | २० |
| जुलै २००७ | ८०४२ | ६१९१ | १३०० | १७४५ | १०२८ | ४ | ९३५ | ५५ |
| मार्च २००७ | १०१८५ | ९१३९ | २२९७ | २२२० | १५९९ | ११ | १४७९ | १०९ |
| डिसेंबर २००६ | ८२५७ | ६७०१ | १५३५ | १९१७ | ९६१ | - | ९१४ | ४७ |
| जुलै २००६ | ६७३५ | ५१९९ | १३९५ | १४८० | ८३५ | २ | ८०० | ४२ |
| मार्च २००६ | १०६८७ | ९४८१ | २८६९ | २२९७ | १३६० | ६ | १२५९ | ९५ |
| डिसेंबर २००५ | ८३६६ | ६५८१ | १६२६ | १९१२ | १२५२ | ३ | १२२८ | २१ |
| जुलै २००५ | ८११७ | ५७५७ | ५४९ | १५२४ | २०९७ | ६ | २०३८ | ५३ |
| मार्च २००५ | ९२४८ | ९२४८ | २७८२ | १४६६ | १५४० | ९ | ९३८ | १४१ |
| **एकूण** | **१३४१४६** | **११६०२८** | **२३०३४** | **३५१८०** | **१८८५८** | **१२१** | **१७१४४** | **१११६** |

*मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले

स्रोत : संक्षिप्त अहवाल

- एकूण कार्यवाहीत घेतलेल्या प्रश्नांपैकी १ टक्काही प्रश्न चर्चिले जात नाहीत.
- स्वीकृत तारांकित प्रश्नांपैकी ९१% प्रश्नांवर वेळेअभावी चर्चा झाली नसून मागील ५ वर्षामध्ये १२१ प्रश्नांवर सदस्यांच्या अनुपस्थितीमुळे चर्चा झाली नाही.

## सार्वजनिक हिताचं घोंगडं वेळेअभावी भिजत पडलंय!

**लक्षवेधी सूचना :**

निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे संबंधित मंत्र्यांचे लक्ष वेधण्यासाठी जी सूचना दिली जाते तिला लक्षवेधी सूचना म्हणतात. या सूचनेच्या माध्यमातून प्रशासनातील उणिवा शासनाच्या लक्षात आणून देणे, त्याबाबत शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कारवाई ही देखील सभागृहापुढे निवेदनाद्वारे आणून देणे व या माध्यमातून शासनावर अंकुश ठेवणे, इत्यादी उद्दिष्ट साध्य करता येतात.

*स्त्रोत : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांकरिता मार्गदर्शिका*

### मागील ६ वर्षांत एकूण सूचनांपैकी १९ टक्के सूचना स्वीकृत तर केवळ ५ टक्के सूचनांवर चर्चा

**तक्ता क्र. २६** लक्षवेधी सूचना

| अधिवेशन | आलेल्या एकूण सूचना | स्वीकृत झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचना |
|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | ३६६८ | १४१ | ४० |
| जुलै २०१० | ३०५९ | १५८ | ३३ |
| मार्च २०१० | ४७३९ | ३०१ | ८० |
| डिसेंबर २००९ | २३२८ | ४२४ | ९१ |
| जून २००९ | २५०३ | ५८१ | १०७ |
| मार्च २००९* | ६४८ | - | - |
| डिसेंबर २००८ | २२७६ | ७६१ | ८३ |
| जुलै २००८ | २१३८ | २९९ | ६३ |
| मार्च २००८ | २४२९ | ५७७ | १८२ |
| डिसेंबर २००७ | १५२२ | ५०१ | ८८ |
| जुलै २००७ | १९३६ | ६२१ | २३४ |
| मार्च २००७ | २२०१ | ६३८ | २७२ |
| डिसेंबर २००६ | १७१३ | ३९० | ११४ |
| जुलै २००६ | १९४२ | ४०९ | १७२ |
| मार्च २००६ | २५४७ | ७७९ | २१५ |
| डिसेंबर २००५ | १६४५ | ३८३ | ७३ |
| जुलै २००५ | १८३८ | ४३० | १२८ |
| मार्च २००५ | २३१० | ६२२ | १९८ |
| एकूण | ४१४४२ | ८०१५ | २१७३ |

*मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले*

*स्त्रोत : संक्षिप्त अहवाल*

## अशासकीय ठरावावर चर्चा केवळ एक टक्का!

अशासकीय ठराव हे महत्त्वाचे संसदीय आयुध असून सार्वजनिक हिताच्या बाबींवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी हे एक उपयुक्त माध्यम सदस्यांना उपलब्ध असते. सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सभागृहाचे मत जाणून घेणे, अथवा शिफारस करणे या उद्देशाने सदस्यांना सभागृहात ठरावाच्या स्वरुपात प्रस्ताव मांडून शासनाच्या एखाद्या कृतीविषयी, ध्येय धोरणाविषयी मत व्यक्त करता येते, तसेच लक्ष वेधता येते. *(स्रोत : महाराष्ट्र विधानसभा सदस्यांकरिता मार्गदर्शिका)*

### अशासकीय ठराव :

**तक्ता क्र.** २७ अशासकीय ठराव

| अधिवेशन | प्राप्त झालेल्या सूचना | मान्य झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचना |
|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | ३६१ | २८३ | ० |
| जुलै २०१० | २८० | २३८ | ४ |
| मार्च २०१० | ३४७ | २७१ | २ |
| डिसेंबर २००९ | १८९ | १६४ | २ |
| जून २००९ | २७८ | २३८ | ३ |
| मार्च २००९* | - | - | - |
| डिसेंबर २००८ | २८३ | २६५ | ५ |
| जुलै २००८ | २९० | २६५ | ० |
| मार्च २००८ | ३०९ | २८७ | ५ |
| डिसेंबर २००७ | ३१९ | ३०२ | ५ |
| जुलै २००७ | ३३२ | ३१२ | ० |
| मार्च २००७ | ३१२ | २८६ | ५ |
| डिसेंबर २००६ | ३२० | ३०१ | १ |
| जुलै २००६ | ३०६ | २८६ | ३ |
| मार्च २००६ | ३२७ | २९१ | ८ |
| डिसेंबर २००५ | ३२४ | २८८ | २ |
| जुलै २००५ | २९० | २५५ | ३ |
| मार्च २००५ | ३१९ | २४२ | ३ |
| **एकूण** | ५१८६ | ४५८२ | ५१ |

**मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल*

- मागील सहा वर्षात एकूण ५१८६ अशासकीय ठरावाच्या सूचना प्राप्त झाल्या परंतु केवळ १टक्का सूचनांवर म्हणजे ५१ सूचनांवर चर्चा झाली म्हणजेच ९९% सूचनांवर चर्चा झाली नाही.
- **जुलै २००७ व जुलै २००८ मध्ये अनुक्रमे ३३२ व २९० सूचना प्राप्त होऊनदेखील एकाही सूचनेवर चर्चा झालेली नाही.**

## सहा वर्षात ९८% स्थगन प्रस्तावाच्या सूचनांवर चर्चा शून्य

हे अत्यंत महत्त्वाचे आयुध आहे. सभागृहाचे कामकाज स्थगित करून या विषयावर चर्चा करावी यासाठी हा प्रस्ताव मांडला जातो. त्यामुळे तो विषय अत्यंत महत्त्वाचा असणे आवश्यक आहे. तसे नसेल तर तो प्रस्ताव नाकारला जातो. महापूर, भूकंप, बॉम्बस्फोट, लाठीमार इत्यादी आकस्मिकरित्या उद्भवलेल्या घटनांचे प्रतिबिंब त्याच दिवशी सभागृहात उमटणे गरजेचे असते. त्यासाठी सभागृहातील नेहमीचे कामकाज बाजूला सारून सभागृहाचे लक्ष वेधून चर्चा घडवून आणण्यासाठी नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्ताव या संसदीय आयुधाचा वापर केला जातो. संसदीय कार्यपद्धतीमध्ये या आयुधाचे स्वरुप शासनाच्या कारभारावर ठपका ठेवणारे (Censure Motion) असते.

**स्थगन प्रस्ताव (Adjournment Motion) (म.वि.स.नियम९७ अन्वये)**

तक्ता क्र. २८ स्थगन प्रस्ताव

| अधिवेशन | आलेल्या एकूण सूचना | मान्य झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचनांचे विषय | चर्चा झालेल्या सूचनांचे आलेल्या सूचनांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | १३७ | ० | ० | ० | ० |
| जुलै २०१० | १८७ | ० | ० | ० | ० |
| मार्च २०१० | २२२ | ० | ० | ० | ० |
| डिसेंबर २००९ | १२७ | ० | ० | ० | ० |
| जून २००९ | ६९ | ० | ० | ० | ० |
| मार्च २००९* | ३ | ० | ० | ० | ० |
| डिसेंबर २००८ | १०० | ५ | ५ | १ | ०५.०० |
| जुलै २००८ | ५७ | ० | ० | ० | ० |
| मार्च २००८ | २१७ | ० | ० | ० | ० |
| डिसेंबर २००७ | ७७ | ० | ० | ० | ० |
| जुलै २००७ | ८० | ० | ० | ० | ० |
| मार्च २००७ | ११० | ० | ० | ० | ० |
| डिसेंबर २००६ | ७४ | १७ | १७ | ३ | २२.९७ |
| जुलै २००६ | ११२ | २० | २० | २ | १७.८५ |
| मार्च २००६ | २३५ | १० | १० | १ | ०४.२५ |
| डिसेंबर २००५ | १२० | ० | ० | | ० |
| जुलै २००५ | ७१ | ० | ० | | ० |
| मार्च २००५ | २४२ | ० | ० | | ० |
| **एकूण** | २२४० | ५२ | ५२ | ७ | २.३२ |

**मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले*

*स्रोत : संक्षिप्त अहवाल*

- **मागील सहा वर्षाच्या काळात एकूण २२४० स्थगन प्रस्तावाच्या सूचना प्राप्त झाल्या त्यातील ७ विषयांच्या ५२ सूचना मान्य होऊन त्यावर चर्चा झाली.**

# औचित्याचे मुद्दे

तक्ता क्र. २९ औचित्याचे मुद्दे

| अधिवेशन | उपस्थित केलेले मुद्दे | मान्य झालेल्या सूचना | मान्य झालेल्या सूचनांचे आलेल्या सूचनांशी प्रमाण |
|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | - | ९२ | |
| जुलै २०१० | ९३ | - | |
| मार्च २०१० | - | ८७ | |
| डिसेंबर २००९ | - | ४१ | |
| जून २००९ | - | १७ | |
| मार्च २००९* | १९ | - | - |
| डिसेंबर २००८ | - | ४५ | |
| जुलै २००८ | - | - | - |
| मार्च २००८ | - | - | - |
| डिसेंबर २००७ | - | - | - |
| जुलै २००७ | ७७ | - | - |
| मार्च २००७ | ५६ | - | - |
| डिसेंबर २००६ | - | - | - |
| जुलै २००६ | - | - | - |
| मार्च २००६ | - | - | - |
| डिसेंबर २००५ | - | - | - |
| जुलै २००५ | - | - | - |
| मार्च २००५ | १८१ | ६१ | ३३.७० |
| **एकूण** | ४२६ | ३४३ | ८०.५१ |

*मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले

*स्रोत : संक्षिप्त अहवाल*

## अर्धा-तास चर्चा (Half & hour discussion) (नियम-९४)

अर्धा तास चर्चा हे संसद व विधानमंडळात वापरले जाणारे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. विधानसभा नियमामध्ये १९७०पूर्वी फक्त प्रश्नातून उद्‌भवणाऱ्या अर्धा तास चर्चेची तरतूद होती. १९७०-७१ साली या नियमात बदल केले गेले त्यानुसार प्रश्नाव्यतिरिक्त इतर सार्वजनिक महत्त्वाच्या परंतु राज्यव्यापी नसलेल्या विषयावर चर्चा उपस्थित करता येते.

**महत्त्वाच्या बाबी :**

१) अर्धा तास चर्चा अलिकडच्या प्रश्नोत्तरावर करावी.

२) ही चर्चा सार्वजनिक महत्त्वाची असली पाहिजे.

३) त्या प्रश्नासंबधी राज्य शासनाची जबाबदारी असली पाहिजे.

४) सूचना थोडक्यात, मुद्देसूद व सुस्पष्ट असावी तसेच तो प्रश्न का उद्‌भवतो याची थोडक्यात माहिती द्यावी. त्याला इतर दोन सदस्यांचे अनुमोदक म्हणून सह्या असाव्यात.

५) अर्धा तास चर्चेची सूचना ज्या दिवशी उपस्थित करायची आहे त्याच्या तीन पेक्षा कमी नसतील इतके दिवस लेखी सूचना दिली जावी.

६) अध्यक्षांस संबंधित मंत्र्यांच्या संमत्तीने चर्चेचा कालावधी कमी करता येईल किंवा सूचना अनावश्यक ठरवता येईल. परंतु जर सूचना देणारा सदस्य अनुपस्थित असेल तर अनुमोदन देणाऱ्या कोणत्याही सदस्यास अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेला सुरुवात करता येईल.

७) प्रश्नातून उद्‌भवणारी अर्धा तास चर्चा ही दर मंगळवारी त्या दिवसाचे कामकाज संपल्यानंतर घेण्यात येते. तसेच इतर बाबीतून उद्‌भवणारी चर्चा ही दर गुरुवारी घेण्यात येते. जर मंगळवारी प्रश्नातून उद्‌भवणारी चर्चा नसेल तर त्या दिवशीही इतर बाबींवर उद्‌भवणारी चर्चा घेण्यात येते.

८) एका दिवशी केवळ दोन अर्धा तास चर्चा घेण्यात येतात. दोन पेक्षा अधिक चर्चा मान्य झाल्या असल्यास बॅलेटप्रमाणे स्वीकृत झालेल्या पहिल्या दोन सूचना घेण्यात येतात.

९) सभागृहात संबंधित सदस्य उपस्थित केलेल्या मुद्यांवर निवेदन करतात व त्यावर उत्तरादाखल संबंधित मंत्री निवेदन करतात. त्यानंतर सदस्यांना माहिती मिळवण्यासाठी २-३ प्रश्न विचारण्याची अध्यक्ष परवानगी देऊ शकतात. ३० मिनिटात २ अर्धा तास चर्चा उपस्थित करावयाच्या असतात. उदा: गावातील पाणी पुरवठ्याचा प्रश्न, गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न यासाठी नियम ९४ अन्वये चर्चा केली जाते.

तक्ता क्र. ३० अर्धा-तास चर्चा

| अधिवेशन | अर्धा तास चर्चेला आलेल्या एकूण सूचना | मान्य झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचना | चर्चा झालेल्या सूचनांचे मान्य सूचनांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०१० | ४४२ | ३२३ | २ | ०.६१ |
| जुलै २०१० | २४८ | १३७ | ६ | ४.३७ |
| मार्च २०१० | ३०४ | १४१ | ५ | ३.५४ |
| डिसेंबर २००९ | २२४ | ११० | ५ | ४.५४ |
| जून २००९ | १६७ | ८२ | ५ | ६.०९ |
| मार्च २००९* | - | - | - | - |
| डिसेंबर २००८ | २२६ | १६६ | ६ | ३.६१ |
| जुलै २००८ | ५२५ | २७० | १ | ०.३७ |
| मार्च २००८ | ३३६ | १९३ | १६ | ८.२९ |
| डिसेंबर २००७ | २७३ | १५० | ५ | ३.३३ |
| जुलै २००७ | ३३९ | १७८ | १ | ०.५६ |
| मार्च २००७ | ३०७ | १६२ | ८ | ४.९३ |
| डिसेंबर २००६ | २६५ | १५१ | ३ | १.९८ |
| जुलै २००६ | २३७ | १३७ | ७ | ५.१० |
| मार्च २००६ | ३०२ | १७१ | ६ | ३.५० |
| डिसेंबर २००५ | २४४ | १२० | ३ | २.५ |
| जुलै २००५ | १६३ | ६१ | २ | ३.२७ |
| मार्च २००५ | १८३ | ७० | ८ | ११.४२ |
| एकूण | ४७८५ | २६२२ | ८९ | ३.३९ |

*मार्च २००९ चे अधिवेशन फक्त ४ दिवस चालले

स्रोत : संक्षिप्त अहवाल

- मार्च २००५ ते डिसेंबर २०१० या कालावधीत अर्धा तास चर्चेसाठी एकूण ४७८५ सूचना आल्या होत्या त्यातील २६२२ सूचना मान्य होऊन ८९ सूचनांवर चर्चा झाली. म्हणजेच मान्य झालेल्या सूचनांपैकी ३.३९ टक्के सूचनांवर चर्चा झाली.

कायदेमंडळ, कार्यपालिका आणि न्यायपालिका हे संसदीय राज्यप्रणालीचे तीन खांब आहेत. कायदेमंडळाचे कार्य कायदे बनविणे, कार्यपालिकेने त्याची अंमलबजावणी करणे आणि न्यायपालिकेने न्यायदान करणे अपेक्षित आहे. वस्तुस्थिती मात्र भिन्न दिसत आहे. कार्यपालिका म्हणजे सरकारच आज कायदेमंडळ झाले आहे. 'होयचे बहुमत' म्हणत केवळ सरकारी विधेयके चर्चेशिवाय मंजूर होतानाचे चित्र लोकशाहीला घातक ठरत आहे. त्यामुळे कायदेमंडळाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. संविधानातील १०व्या अनुसूचिमध्ये सदस्यांना अपात्र ठरविण्याचा जो अधिकार राजकीय पक्षाला आहे, त्यात सुधारणा करून विधेयकावर मतदान करताना 'पक्षादेश' काढला जाणार नाही, त्यावर सरकारचे विश्वासमत असणार नाही. अशी मूलभूत सुधारणा करण्याचा विचार सर्व सन्माननीय सदस्य व लोकशाहीची बूज राखणारे पत्रकार, विचारवंत, राजकारणी करतील काय?

सदर प्रस्तुत पुस्तिकेतील माहितीवरून वाचकांच्या हे सहज लक्षात येईल की, सरकारवरील विधिमंडळाचा अंकुश कमी कमी होत चालला आहे, हा धोक्याचा गंभीर इशारा आहे. महाराष्ट्र विधानसभा नियम २४४ (क) नुसार विभागसंलग्न स्थायी समित्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्यक्षात त्या अस्तित्वात नाहीत. विधिमंडळाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त विधिमंडळाचा अंकुश कार्यपालिकेवर प्रभावी रहावा म्हणून या समित्या गठित केल्या जाणार आहेत काय? अमृतमहोत्सवी विधिमंडळ संरचनात्मक सुधारणांतून या प्रश्नांना नक्कीच उत्तर देईल अशी अपेक्षा आहे.

**- विवेक पंडित**

# अमृतमहोत्सवी विधिमंडळ
# 'शुभेच्छा व अपेक्षा'

विधिमंडळाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्यानिमित्ताने विधिमंडळाचा पाया ज्या ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांनी रचिला, त्या साऱ्यांना प्रथम अभिवादन तसेच आपल्या वैशिष्ट्यपूर्ण योगदानाने ज्यांनी विधिमंडळाची जडणघडण केली अन् महाराष्ट्रामध्ये वैचारिकतेचा, मौलिकतेचा आदर्श दृढ केला त्या साऱ्यांना 'समर्थन'चा सलाम. कारण त्यांनी प्रदान केलेल्या मौलिकतेवरच 'समर्थन' सारख्या संशोधनाची आस असणाऱ्या, मूलभूत संरचनात्मक सुधारणांची कास धरलेल्या संस्थेचे बौद्धिक भरणपोषण होत असते.

अर्थसंकल्प विश्लेषण, विविध ऐरणीवरल्या सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांविषयी अभ्यासपूर्ण माहितीचे आदान-प्रदान या माध्यमातून 'समर्थन' अणि विधिमंडळातील नात्याची वीण १९९४ पासून दृढ होत आलीय. अमृतमहोत्सवी वर्षाच्यानिमित्ताने विधिमंडळाच्या भविष्यातील कामकाजास शुभेच्छा देताना विधिमंडळाकडून प्रातिनिधिक स्वरुपात काही अपेक्षाही करीत आहोत. या अपेक्षांचा अमृतमहोत्सवी वर्षात विधिमंडळ गांभीर्याने विचार करील, या अपेक्षेसह 'समर्थन'कडून विधिमंडळाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा. १९९४ पासून विधिमंडळाचा 'समर्थन'शी असलेला स्नेहसंबंध अधिकाधिक दृढ होईल, ही आशा आहे. तसेच लोकशाहीसारखे मूलभूत मूल्य चिरंतन रहावे व या लोकशाहीच्या पवित्र मंदिरात समाजातील अतिदुर्बल घटकातील अंतिम व्यक्तीसही विनासायास न्याय मिळावा ही अमृतमहोत्सवी विधिमंडळाकडून अपेक्षा.

- मुक्ता भारती